**नियमित दिवाणी दावा क्र.३१९/२०२४**

(बाबासो वि. सिताराम)

**CNR No.MHSO07-000393-2024**

## <u>निशाणी क्र.११ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीच्या कथनानुसार, याकामी त्यांना महत्वाची कागदपत्रे व माहिती मुदतीत उपलब्ध झाले नसल्यामुळे त्यांना मुदतीमध्ये कैफियत दाखल करता आले नाही. त्यांना कैफियत दाखल करणेस ११ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदर वाद हा स्थावर मिळकतीसंदर्भात असल्यामुळे त्यांची कैफियत अभिलेखावर असणे गरजेचे आहे. त्यामुळे दाव्याचे गुणदोषावर निर्णय होण्यास मदत होणार आहे. सबब, त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येऊन त्यांनी अर्जासोबत दाखल केलेले कैफियत स्वीकारण्यात यावे अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे. विकल्पेकरुन अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास रक्कम रुपये ५०००/- खर्चाची आकारणी करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी तर्फे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज व त्यावरील म्हणणे तसेच अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता, प्रतिवादीचे देखील हक्क हितसंबंध दाव्यात गुंतलेले आहेत. त्यामुळे त्यांना देखील त्यांच्या बचावाची संधी मिळणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादीच्या विनंतीनुसार त्यांना कैफियत दाखल

करण्यास झालेला विलंब माफ न केल्यास आणि त्यांना त्यांचे कैफियत दाखल करण्याची परवानगी न दिल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होईल. परंतू तशाप्रकारे परवानगी दिली गेल्यास वादीवर कुठलाही अन्याय होत नाही. उलटपक्षी दावा गुणदोषावर निकाली करण्यास त्याची मदतच होते. सबब, खालील आदेशाद्वारे प्रस्तुतचा अर्ज निकाली करण्यात येत आहे.

आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज रक्कम रुपये २००/– खर्चासह मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | प्रतिवादीने खर्चाची रक्कम वादीस पुढील तारखेपर्यंत अथवा तत्पूर्वी द्यावी. |
| ३. | प्रतिवादीने वरीलप्रमाणे खर्चाची पूर्तता केल्यानंतर त्यांना कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ करण्यात येत आहे आणि त्यांनी अर्जासोबत दाखल केलेले कैफियत अभिलेखावर घेण्यात येत आहे. |

PRAVIN PUNDLIK BAGUL

Digitally signed by PRAVIN PUNDLIK BAGUL
Date: 2025.01.18 17:17:19 +0530

(पी. पी. बागुल)

दिनांकः– १६.०१.२०२५

४थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पंढरपूर

# Certificate

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. S. Tupdauru |
| Court | - | $4^{th}$ Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 16.01.2025 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 16.01.2025 |
| Judgment/Order uploaded on | - | 18.01.2025 |